# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण

१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०२३-२४/शिष्यवृत्ती/ ५०२० दिनांक : २८.०२.२०२४

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित/
टप्पा अनुदानित/कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या ४० तालुक्यांव्यतिरिक्त इतर तालुक्यातील दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित केलेल्या १०२१ महसूली मंडळांपैकी विभाजन झालेल्या नवीन महसूल मंडळांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित करुन सवलती लागू करण्याबाबत...**

संदर्भ : - १. महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/ म-७/ दि. १०.११.२०२३.
२. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं- परीक्षा शुल्क-२०२३-२४ दि. ०४.१२.२०२३.
३. प्रस्तुत कार्यालयाचे परिपत्रक दि. १७.०१.२०२४.
४. महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/ म-७/ दि. १६.०२.२०२४.
५. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं- परीक्षा शुल्क-२०२३-२४/२८३५२६/२०२४ दि. २७.०२.२०२४.

उपरोक्त विषयांबाबत कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील दुष्काळसदृश्य तालुक्यातील महाविद्यालयांना मा. शिक्षण संचालक यांचे संदर्भिय पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणे या योजनेच्या अंमलबजावणीसाठी संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये माहिती मागविण्यात आली होती. तथापि संदर्भिय शासन निर्णय दि. १६.०२.२०२४ आणि संदर्भिय पत्र क्र. ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या ४० तालुक्यांव्यतिरिक्त महसूल वन विभागाचा दि. १६.०२.२०२४ मध्ये नमूद शासन निर्णयामध्ये सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केलेल्या २२४ महसूली मंडळांचा दुष्काळ सदृश्य मंडळांमध्ये समावेश केला आहे. सदर शासन निर्णयामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची सवलत लागू केली आहे. सोबत जोडलेल्या पत्राचे तसेच शासन निर्णयाचे अवलोकन करावे.

तथापि सर्व महाविद्यालयांकडून सदर विषयाचे गांभीर्य विचारात घेऊन सोबत दिलेल्या विवरणपत्रामध्ये महसूल वन विभागाचा दि. १६.०२.२०२४ मध्ये नमूद शासन निर्णयामध्ये सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केलेल्या २२४ महसूली मंडळांचा दुष्काळ सदृश्य मंडळांमध्ये समावेश केला आहेत अशा दुष्काळ सदृश्य भागातील विद्यार्थी ज्याने अन्य कोणत्याही शिष्यवृत्तीचा तसेच आर्थिक सवलतीचा लाभ घेतला नाही अशा विद्यार्थ्यांची माहिती सोबत जोडलेल्या विवरणपत्रामध्ये आणि तीच माहिती मायक्रोसॉफ्ट एक्सेल फॉरमॅटमध्ये इंग्रजी फॉन्ट मध्ये प्राचर्यांच्या सही शिक्क्यासह सोबत जोडलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र जोडून ईमेलद्वारे jdpunescholarship@gmail.com या ईमेल आयडीवर तसेच सहसंचालक कार्यालयामध्ये विनाविलंब हस्तपोहोच सादर करण्यात यावी.

तसेच कोणताही दुष्काळ सदृश्य भागातील विद्यार्थी परीक्षा फी माफीच्या लाभापासून वंचित रहाता कामा नये याची पूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची आणि संबंधित विद्यापीठाच्या कुलसचिवांची राहील.

( डॉ. केशव तुपे )
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.

सन २०२३-२४ च्या दुष्काळसदृश्य तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबतचे तपशीलाचे विवरणपत्र

(रक्कम रुपयात)

| अ.क्र. | सन २०२३-२४ च्या दुष्काळसदृश्य तालुक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी भरलेली आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी फी भरली आहे अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपूर्ती साठी आवश्यक रक्कम | सन २०२३-२४ च्या दुष्काळसदृश्य तालुक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी न भरता प्रमाणपत्र दिले आहेत अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र दाखल केले आहे अशा विद्यार्थ्यांच्या परिक्षा फी प्रतिपूर्ती साठी आवश्यक रक्कम | एकूण विद्यार्थी संख्या | एकूण प्रतिपूर्तीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

स्वाक्षरी

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०२३-२४/शिष्यवृत्ती/ दिनांक : २८.०२.२०२४

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, सोबत जोडलेल्या यादीतील विद्यार्थी हे दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यातील रहिवाशी आहेत. तसेच त्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये ८ लक्ष मर्यादेपर्यंत आहे. त्यामुळे परीक्षा शुल्क माफी साठी पात्र आहेत. विद्यार्थ्यांनी शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलतीनुसार १०० टक्के परीक्षा शुल्क माफी सवलतीसाठी अर्ज भरलेला नाही याची खात्री केलेली आहे.

तरी दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थी संख्या --------- व रक्कम रु. ----------/- (अक्षरी रुपये ----------- फक्त) एवढी आहे.

स्वाक्षरी

I/283526/2024

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे -411001**

web : www.dhepune.gov.in E-mail- schol.dhepune@gov.in

फोन नं -020/29707098/26126939 फॅक्स 020/26111153

क्र.उशिंस - परीक्षा शुल्क- 2023-24/ दिनांक -

प्रति,

1. सर्व विभागीय सहसंचालक,
   उच्च शिक्षण विभाग.
2. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.

**विषय- राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या 40 तालुक्यांव्यतिरिक्त इतर तालुक्यामधील दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित केलेल्या 1021 महसुली मंडळांपैकी विभाजन झालेल्या नवीन महसुल मंडळांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित करून सवलती लागू करण्याबाबत..**

संदर्भ- 1. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एफईडी - 1592/1202/(1132)/साशि-5, दि. 11.10.1993
2. महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. -एससीवाय-2023/प्र.क्र. 37/म-7 ,दि. 10.11.2023.
3. शासन निर्णय क्रमांक: एससीवाय-2023/प्र.क्र.37/म-7, दिनांक- 16.02.2024.

उपरोक्त संदर्भ क्रमांक 1 येथील शासन निर्णयान्वये, राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची विद्यापीठ परीक्षा व परीक्षामंडळे यांची परीक्षा फी माफ करण्याची योजना लागू केली आहे. यामध्ये अकृषि विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांचा समावेश आहे. आता संदर्भिय शासन निर्णय क्रमांक 3 नुसार, राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या 40 तालुक्यांव्यतीरिक्त इतर तालुक्यांमधील ज्या महसूली मंडळांमध्ये जून ते सप्टेंबर 2023 या कालावधीत सरासरी पर्जन्याच्या 75% पेक्षा कमी व एकूण पर्जन्यमान 750 मि.मि पेक्षा कमी झाले आहे अशा वर नमूद दि. 10 नोव्हेंबर, 2023 च्या शासन निर्णया सोबतच्या परिशिष्ट "अ" येथे नमूद केलेल्या एकूण 1021 महसूली मंडळांपैकी ज्या मंडळाचे विभाजन होऊन नवीन महसूली मंडळ स्थापन करण्यात आलेली आहेत आणि त्या महसूली मंडळात अद्याप प्रस्तावामधील या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविलेली 224 नवीन महसूल मंडळे देखील दुष्काळ सदृश्य मंडळे म्हणून घोषित करून या महसुली मंडळाकरिता खालील सवलती लागू करण्यास शासनाची मंजूरी देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची सवलत लागू केली आहे.

त्यानुसार आपल्या अभिनस्त संबंधीत दुष्काळसदृश्य तालूक्यातील महाविद्यालयांना खालील प्रमाणे सुचना देण्यात याव्यात.

1.संदर्भ क्रमांक 1 येथील 18 ऑक्टोंबर, 1993 च्या शासन निर्णयातील परिच्छेद 8 मध्ये नमुद केल्याप्रमाणे दुष्काळ सदृश्य तालुक्यातील सवलतीस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांन कडून महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी परीक्षा फी न घेता त्यांचे आवेदन पत्रे विद्यापीठाकडे संदर्भ क्र.1 च्या शासन निर्णयात नमुद केलेल्या प्रमाणपत्रावर सांक्षाकित करुन पाठवावे.

2. सद्यस्थितीत विद्यापीठांचे पहिले शैक्षणिक सत्र संपलेले असल्याने महाविद्यालयाने त्यांचे महाविद्यालयात सन 2023-24 च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील पात्र विद्यार्थी शिक्षण घेत असल्यास सदर लाभार्थ्यांना परीक्षा शुल्कापोटी भरलेल्या रक्कमेची प्रतिपुर्ती करण्यासाठी त्यांचेकडून आलेल्या आवेदन पत्रावरुन प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करुन संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे आवश्यक रक्कमेची मागणी करावी

3. तसेच विद्यापीठांने आपल्याकडे प्राप्त झालेल्या सन 2023-24 च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्ती करण्यासाठी महाविद्यालयनिहाय आलेल्या आवेदन पत्रावरून प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करुन विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे आवश्यक रक्कमेची मागणी करावी .

4. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी महाविद्यालयांकडून / विद्यापीठांकडून आलेल्या माहितीची तपासणी करुन आवश्यक रक्कमेची माहिती संचालनालयाकडे सोबतच्या विवरणपत्र अ मध्ये सादर करावी. सदरची माहिती सादर

केल्यानंतर संचालक स्तरावरुन सहसंचालक कार्यालयांना सदर योजनेसाठी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल व सहसंचालक स्तरावरुन संबंधित रक्कमेची प्रतिपुर्ती करण्यात येईल.

5. कोणत्याही परिस्थितीत दुष्काळ सदृश्य तालुक्यातील पात्र विद्यार्थी सदर योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

Signed by Prakash Dhondu Bachhav
Date: 23-02-2024 15:00:49
Reason: Approved

(डॉ. प्रकाश बच्छाव)
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे -1

प्रत,-मा. प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -32

**विवरणपत्र - अ**



**सन 2023-24 च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत तपशिलाचे विवरणपत्र.(रक्कम रुपयात)**

| अ.क्र. | सन 2023-24 च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी भरलेली आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी फी भरली आहे अशा विद्यार्थ्यांच्या परिक्षा फी प्रतिपुर्ती साठी आवश्यक रक्कम | सन 2023-24 च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी न भरता प्रमाणपत्र दिले आहेत अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र दाखल केले आहे अशा विद्यार्थ्यांच्या परिक्षा फी प्रतिपुर्ती साठी आवश्यक रक्कम | एकूण विद्यार्थी संख्या | एकूण प्रतिपुर्तीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |

**स्वाक्षरी**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, सोबत जोडलेल्या यादीतील विद्यार्थी हे दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यातील रहिवाशी आहेत. तसेच त्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये 8 लक्ष मर्यादिपर्यंत आहे. त्यामुळे ते परीक्षा शुल्क माफी साठी पात्र आहेत. विद्यार्थ्यांनी शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलतीनुसार 100% परीक्षा शुल्क माफी सवलतीसाठी अर्ज भरलेला नाही याची खात्री केलेली आहे.

तरी दुष्काळग्रस्त भागातील ( विद्यार्थी संख्या) व (रक्कम ) एवढी आहे.

सही/-

विभागीय सहसंचालक

राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या ४० तालुक्यांव्यतिरिक्त इतर तालुक्यामधील दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित केलेल्या १०२१ महसुली मंडळांपैकी विभाजन झालेल्या नवीन महसुल मंडळांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित करून सवलती लागू करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १६ फेब्रुवारी, २०२४.

**वाचा :-**

१) शासन निर्णय, महसुल व वन विभाग क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/२०१७/म-७, दि.७ ऑक्टोबर, २०१७ व दि.२८ जून, २०१८.

२) शासन निर्णय, महसुल व वन विभाग क्र.टंचाई-२०१४/प्र.क्र.२३३/म-७, दि.१३ जून, २०१८, दि.५ डिसेंबर, २०१८, दि.२४ जून,२०२, दि.२१ सप्टेंबर, २०२२, दि.१२ सप्टेंबर, २०२३ व दि.७ नोव्हेंबर, २०२३.

३) समक्रमांकाचा दि. ३१ ऑक्टोबर, २०२३ व दि. १०.११.२०२३ चा शासन निर्णय.

४) मा. मंत्री (मदत, पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन) यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीच्या दि.२ जानेवारी, २०२४ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णय.

५) जिल्हाधिकारी, लातूर यांचे पत्र क्र.२०२४/महसूल/नैआ/डेस्क-२/कावि-५२, दि.६ फेब्रुवारी, २०२४.

**प्रस्तावना:-**

नैसर्गिक आपत्तीच्या घटनांमुळे बाधित होणाऱ्या आपतग्रस्तांना तातडीने मदत देणे शक्य व्हावे, यासाठी अशा प्रस्तावांवर निर्णय घेण्याकरिता कायमस्वरूपी मंत्रिमंडळ उपसमिती वर नमूद क्र.२ येथील दि.१३ जून, २०१८ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आली आहे. सदर मंत्रीमंडळ उपसमितीस वर नमूद क्र.२ येथील दि.५ डिसेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये सन २०१८ च्या दुष्काळी कालावधीसह भविष्यात दुष्काळ उद्भवल्यास, त्या दुष्काळी कालावधीकरिता तातडीने उपाययोजना सुचविण्यासाठी/सनियंत्रण ठेवण्यासाठी/निर्णय घेण्यासाठी पूर्ण अधिकार देण्यात आले आहेत. वर नमूद क्र.२ येथील दि.७ नोव्हेंबर, २०२३ च्या शासन निर्णयानुसार या मंत्रिमंडळ उपसमितीची पुनर्रचना करण्यात आली आहे. दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६ मधील तरतुदी व निकष विचारात घेवून वर नमूद क्रमांक ३ येथील दि.३१ ऑक्टोबर, २०२३ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील ४० तालुक्यामध्ये दुष्काळ घोषित करण्यात आला आहे. या व्यतिरिक्त राज्यातील इतर तालुक्यातील महसुली मंडळामध्ये जून ते सप्टेंबर, २०२३ या कालावधीत कमी पर्जन्यमान झाले असल्याचे आढळून आले आहे. या मंत्रिमंडळ उपसमितीच्या दि.०९ नोव्हेंबर, २०२३ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयास अनुसरून वर नमूद दि.१० नोव्हेंबर, २०२३ च्या

शासन निर्णयाद्वारे राज्यातील कमी पर्जन्यमान झालेल्या १०२१ महसुली मंडळामध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित करून तेथे सवलती लागू करण्यात आल्या आहेत. मंत्रिमंडळ उपसमितीच्या दि.०२ जानेवारी, २०२४ रोजी झालेल्या बैठकीत, खरीप हंगाम-२०२३ करिता दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहिर केलेल्या १०२१ मंडळांपैकी ज्या मंडळाचे विभाजन होऊन नवीन महसूली मंडळ स्थापन करण्यात आले आहे आणि त्या महसूली मंडळात अद्याप पर्जन्यमापक यंत्र (AWS) बसविण्यात आलेले नाही अशी नवीन महसूल मंडळे देखील दुष्काळ सदृश्य मंडळे म्हणून जाहिर करण्यात यावीत, असा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यास अनुसरून सर्व विभागीय आयुक्त यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे तसेच जिल्हाधिकारी, लातूर यांच्या वर नमूद दि.०६ फेब्रुवारी, २०२४ च्या पत्राव्दारे प्रस्तावास अनुसरुन शासन आदेश निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णयः**

राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या ४० तालुक्यांव्यतिरिक्त इतर तालुक्यांमधील ज्या महसुली मंडळामध्ये जून ते सप्टेंबर, २०२३ या कालावधीत सरासरी पर्जन्याच्या ७५% पेक्षा कमी व एकूण पर्जन्यमान ७५० मि.मि. पेक्षा कमी झाले आहे अशा वर नमूद दि.१० नोव्हेंबर, २०२३ च्या शासन निर्णया सोबतच्या परिशिष्ट "अ" येथे नमूद केलेल्या एकूण १०२१ महसुली मंडळांपैकी ज्या मंडळाचे विभाजन होऊन नवीन महसूली मंडळ स्थापन करण्यात आलेली आहेत आणि त्या महसूली मंडळात अद्याप पर्जन्यमापक यंत्र (AWS) बसविण्यात आलेले नाही अशी मंडळे आणि जिल्हाधिकारी, लातूर यांच्या प्रस्तावामधील या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविलेली २२४ नवीन महसूल मंडळे देखील दुष्काळ सदृश्य मंडळे म्हणून घोषित करून या महसुली मंडळांकरिता खालील सवलती लागू करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

१) जमीन महसूलात सूट.
२) सहकारी कर्जाचे पुनर्गठन.
३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती.
४) कृषी पंपाच्या चालू विजबिलात ३३.५% सूट.
५) शालेय/ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी.
६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता.
७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर.
८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

२. या आदेशान्वये देण्यात येणा-या विविध सवलतीपोटीचा आर्थिक भार संबंधित प्रशासकीय विभागांनी उचलावा व त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा. यानुषंगाने प्रशासनिक विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय यंत्रणांकरिता आवश्यक ते पूरक आदेश निर्गमित करावेत. त्यानुसार या प्रकरणी पुढील उचित कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या विभागास सादर करण्यात यावा.

३. संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केलेल्या २२४ महसुली मंडळामध्ये उपरोक्त उपाययोजना अंमलात आणण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यांनी तातडीने सदर उपाययोजना अंमलात आणाव्यात. सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद नागलगाव व

मोघा वगळून उर्वरित महसूली मंडळांपैकी ज्या नवनिर्मित महसूली मंडळामध्ये पर्जन्यमापक यंत्र (AWS) बसविण्यात आलेले असेल आणि ते महसूली मंडळ मंत्रिमंडळ उपसमितीच्या दि.०९ नोव्हेंबर, २०२३ च्या बैठकीतील निर्णयानुसार पर्जन्यमानाचे निकष पूर्ण करित नसेल त्यांच्याकरिता हे आदेश लागू होणार नाहीत.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२४०२१६१५१४५६९२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

SANJAY AUDUMBAR DHARURKAR

Digitally signed by SANJAY AUDUMBAR DHARURKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RELIEF AND REHABILITATION DEPARTMENT, 2.5.4.20=637145fd393d6d5c713e94e6da7bc6bee23011448b7fc64d138630b9c76ae7a2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FCF7172A73579B34FA622983D8FB647780FBEF1D35A1CA975955EB9193F3F800, cn=SANJAY AUDUMBAR DHARURKAR
Date: 2024.02.16 18:35:50 +05'30'

**( संजय औ. धारुरकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. मंत्री (महसूल), मंत्रालय, मुंबई.
५) मा. मंत्री (सहकार), मंत्रालय, मुंबई.
६) मा. मंत्री (ग्राम विकास), मंत्रालय, मुंबई.
७) मा. मंत्री (कृषि), मंत्रालय, मुंबई.
८) मा. मंत्री (पाणी पुरवठा), मंत्रालय, मुंबई.
९) मा. मंत्री (रोजगार हमी योजना), मंत्रालय, मुंबई.
१०) मा.मंत्री (जलसंधारण), मंत्रालय, मुंबई.
११) मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा /विधान परिषद), विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
१२) सर्व मा. विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य
१३) मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई
१४) अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) सर्व विभागीय आयुक्त
१६) सर्व जिल्हाधिकारी
१७) सह सचिव तथा वित्तिय सल्लागार, मदत व पुनर्वसन, नवीन प्रशासन इमारत, मंत्रालय, मुंबई
१८) वित्त विभाग (व्यय-९/ अर्थ-३), मंत्रालय, मुंबई.
१९) महसूल व वन विभाग, कार्यासन क्रमांक म-३/म-११
२०) निवडनस्ती (कार्यासन म-७)

**शासन निर्णय, महसुल व वन विभाग, क्रमांक : एससीवाय:२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि.१६ फेब्रुवारी, २०२४ सोबतचे परिशिष्ट “अ”**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | महसुली मंडळांची संख्या | महसुली मंडळांची नांवे |
|---|---|---|---|---|
| १ | पुणे | हवेली | ७ | उरळी देवाची, डोणाजे, खानापूर,कोंढवे धावडे, अष्टापूर, लोणीकंद, लोणी काळभोर |
| | | भोर | १ | हरणस |
| | | जुन्नर | ३ | वडज, मढ, ओझर |
| | | खेड | २ | वेताळा, करंजविहरे |
| | | आंबेगाव | १ | निरगुडसर |
| २ | सातारा | सातारा | २ | करंजे तर्फे सातारा, कोडोली |
| | | कोरेगांव | १ | साप |
| | | कराड | १ | येळगाव, |
| | | पाटण | ३ | येराड, आवर्डे, मारूल हवेली |
| | | फलटण | १ | कोळकी |
| | | खटाव | २ | कलेढोण,भोसरे |
| | | माण | २ | वरकुटे-मलवडी, आंधळी |
| ३ | सांगली | तासगांव | १ | वायफळे |
| | | जत | १ | तिकोडी |
| ४ | सोलापूर | उत्तर सोलापूर | ४ | मजरेवाडी, बाळे, कोंडी, सोरेगाव |
| | | दक्षिण सोलापूर | १ | औराद |
| | | अक्कलकोट | १ | नागणसूर |
| | | मोहोळ | १ | अनगर |
| | | पंढरपूर | २ | खर्डी, रोपळे |
| | | मंगळवेढा | १ | पाटखळ |
| ५ | कोल्हापूर | करवीर | ३ | उचगाव,  गोकुळ शिरगाव, शिंगणापूर |
| | | हातकंणगले | २ | कुंभोज, शिरोली |
| ६ | नाशिक | नांदगांव | ३ | न्यायडोंगरी, बाणगांव बु., भार्डी |
| | | चांदवड | २ | शिंगवे, धोडंबे |
| | | नाशिक | २ | महिरावणी, भगूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | बागलाण | ३ | मुंजवाड, किकवार खु., टेंभे वरचे |
| | | निफाड | २ | पालखेड,विंचूर |
| | | देवळा | १ | खर्डे |
| ७ | धुळे | धुळे | ९ | देवपूर , वलवाडी, मोहाडी प्र.लं., महिंदळे, देऊर बु., कापडणे, न्याहाळोद,गाडउतार, मोघण |
| | | साक्री | १० | शेवाळी दा., छाईल, जैताणे, बळसाणे, रोहोड, कुडाशी, टेंभे प्र.वारसा, सामोडे, छडवेल क., बल्हाणे |
| | | शिरपूर | ४ | गिधाडे, करवंद, कोडीद, दहीवद |
| ८ | जळगांव | जळगांव | २ | कानळदा, शिरसोली |
| | | जामनेर | २ | गारखेडा, पाळधी |
| | | भुसावळ | १ | खडका |
| | | मुक्ताईनगर | १ | निमखेडी |
| | | बोदवड | १ | शेलवड |
| | | एरंडोल | १ | भालगांव बु. |
| | | धरणगांव | १ | झुरखेडा |
| | | पारोळा | २ | सार्वे बु. बोळे |
| | | अमळनेर | २ | टाकरखेडा, हेडावे |
| | | चोपडा | १ | आडगांव |
| | | यावल | २ | अंजाळ, सावखेडेसिम |
| | | रावेर | २ | पाल, केऱ्हाळे बु. |
| | | पाचोरा | २ | लोहटार, शिंदाड |
| | | भडगांव | २ | गिरड, गोंडगांव |
| | | चाळीसगांव | २ | वाघळी, पाटणा |
| ९ | अहमदनगर | जामखेड | २ | साकत, पाटोदा |
| | | शेवगांव | २ | मुंगी,दहिगांव ने |
| | | श्रीगोंदा | ३ | भानगांव,अढळगांव,लोणी व्यंकनाथ |
| | | पारनेर | ४ | कान्हूर पठार, पळवे खु.,जवळा,अळकुटी |
| | | नेवासा | ३ | भानसहिवरे,प्रवरासंगम,देडगांव |
| | | राहता | १ | अस्तागांव |
| | | श्रीरामपूर | १ | कोरेगांव |
| | | कोपरगांव | १ | कोकमठाण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | अकोले | ४ | खिरवरे,लिंगदेव,वाकी,रूंभोडी |
| | | पाथर्डी | ३ | अकोला,खरवंडी,तिसगांव |
| | | राहुरी | १ | बारागांव नांदुर |
| | | नगर | १ | नेप्ती |
| | | कर्जत | ४ | कोरेगांव,खेड,कुळधरण,वालवड |
| | | संगमनेर | ४ | नांदुरखंदरमाळ,संगमनेर खु.,निमोण,घुलेवाडी |
| १० | छत्रपती संभाजीनगर | फुलंब्री | २ | बाबरा,पालोद |
| | | सिल्लोड | ३ | उडणगाव,शिवणा,अंभई |
| | | खुलताबाद | ३ | खुलताबाद,आपेगाव,निलजगांव |
| | | वैजापूर | २ | घायगाव,जानेफळ |
| | | कन्नड | ३ | हतनूर,नागद,जामगाव |
| | | गंगापूर | ३ | गाजगाव,आसेगाव,डोणगाव |
| ११ | जालना | जाफ्राबाद | १ | कोळेगाव |
| | | परतूर | १ | कोकोटे हादगांव |
| | | घनसावंगी | १ | पानेवाडी |
| १२ | परभणी | परभणी | १ | टाकळी कुंभकर्ण |
| | | पुर्णा | १ | कावलगाव |
| | | पालम | २ | पेठशिवणी,रावराजूर |
| | | गंगाखेड | १ | पिंपळदरी |
| | | सोनपेठ | २ | शेळगाव,वडगांव |
| | | पाथरी | १ | कासापुरी |
| | | मानवत | २ | रामपुरी,ताडबोरगाव |
| | | जिंतूर | २ | वाघीधानोरा,दुधगाव |
| | | सेलू | १ | मोरेगाव |
| १३ | हिंगोली | हिंगोली | २ | खानापूर चिता,भांडेगांव |
| | | कळमनुरी | १ | साळवा |
| | | औढा नाग | २ | सिध्देश्वर,शिरड शहापूर |
| | | सेनगांव | २ | पुसेगांव,बाभुळगांव |
| १४ | नांदेड | नांदेड | १ | नांदेड |
| | | नायगाव खै | १ | धुगराळा |
| | | कंधार | १ | दिग्रस बु. |
| | | लातूर | १ | कन्हेरी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | औसा | १ | उजनी |
| १५ | लातूर | उदगीर | ३ | तोंडार, नागलगाव, मोघा |
| | | चाकूर | १ | आष्टा |
| | | निलंगा | २ | हलगरा,भुतमुगळी |
| १६ | बीड | बीड | ५ | कुर्ला,घाटसावळी,पारगाव (सि),चऱ्हाटा,येळंबघाट |
| | | पाटोदा | १ | कुसळंब |
| | | आष्टी | ३ | दादेगाव,डोईठाण,आष्टा ह.ना. |
| | | गेवराई | ३ | पाडळसिंगी,कोळगांव,माटेगांव |
| | | माजलगाव | १ | मंजरथ |
| | | केज | २ | चिंचोलीमाळी,मस्साजोग |
| | | परळी वै | १ | मोहा |
| | | शिरूर कासार | ३ | गोमळवाडा,ब्र.येळंब,खालापुरी |
| १७ | धाराशिव | परंडा | २ | पाचपिंगळ,शेळगाव |
| | | कळंब | २ | मस्सा ख.,नायगाव |
| | | भूम | २ | आष्टा,पाथरूड |
| | | उमरगा | २ | बेडगा,बलसूर |
| | | तुळजापूर | २ | तामलवाडी,आरळी बु. |
| १८ | नागपूर | सावनेर | १ | चिचोली (खापरखेडा) |
| | | मौदा | १ | तारसा |
| | | रामटेक | २ | पवनी,हिवरा बाजार |
| | | कळमेश्वर | १ | गोंडखैरी |
| १९ | वर्धा | आर्वी | १ | दाऊतपूर |
| | | कारंजा | १ | दाभा |
| | | समुद्रपूर | १ | पाईकमारी |
| **एकूण :-** | | | **२२४** | |